# प्रेस नोट दिनांक ०९/०२/२०२२

## धारदार हत्यारांचा धाक दाखवुन लुटमार करणा-या आरोपींना अटक दरोडयाचे गुन्हे उघड

## गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

१) पिंपरी पोस्टे गुन्हा रजिस्टर नंबर पिंपरी १६६/२०२३, भा.दं.वि.कलम ३९२, ५०४, भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५), महा.पो.का.क. ३७ (१) १३५ सह क्रि.लॉ.अमेंडमेंट १९३२ चे कलम ३,७
२) चिचवड पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ६४/२०२३ भादवि कलम ३९७, ३४
३) चिखली पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ८८/२०२३ भादवि कलम ३९२ प्रमाणे

दिनांक ०६/०२/२०२३ रोजी २१/३० वाचे सुमा रुपेश्वर सुपर मार्केट ,महालक्ष्मी कॉम्पलॅक्स हरगुडे वस्ती नेवाळे वस्ती चिखली येथील दुकानांतील कॅश कॉऊण्टरच्या ड्रॉवरमधुन रोख रक्कम रुपये ५०००/- रुपये जबरदस्तीने हत्यारांचा धाक दाखवुन काढुन घेतले.

२३/१५ वाजणेचे सुमारास हिटलर क्रॉस चायनिज हॉटेल मासुळकर बस स्टॉप समोर अजमेरा पिंपरी येथे हातामध्ये कोयता, कु-हाड व तलवार घेवुन हॉटेलमध्ये कामगारांना शिवीगाळ,धमकी देवुन व दहशत निर्माण करुन ड्रॉवर मधुन १५००/- रु जबरदस्तीने काढुन घेतले.

२३.५० वाजणेचे सुमारास चिंचवड एम्पायर इस्टेट बेल्जीएम वॉफल्स कंपनीच्या स्टोअरमध्ये हातात तलवारी व हत्यारे घेवून दहशत माजवुन ३०००/- रुपये जबरदस्तीने काढुन घेतले.

एकूण सहा अनोळखी आरोपींनी दोन मोटर सायकलवरुन येवून कु-हाड, तलवार अशा धारदार शस्त्रांचा धाक दाखवुन एका पाठोपाठ एक गुन्हे करुन दहशत माजविल्याची नियंत्रण कक्षाला माहीती मिळाली. गुन्हे शाखा युनिट २ चे रात्रगस्त अधिकारी वरीष्ठ पोलीस निरीक्षक सतिश नांदुरकर यांना माहीती मिळताच गुन्हे शाखेच्या पथकाकरवी आरोपींचे मिळालेल्या वर्णनावरुन शोध सुरु केला. सदर तिन्ही घटनेतील आरोपी एकच असल्याची खात्री झाली व सदर गुन्हयात सहभाग असलेला आरोपी व दोन अल्पवयीन विधीसंघर्षीत बालक यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांनी व त्यांचे इतर तीन सार्थीदारांसह वरील नमुद गुन्हे केल्याचे कबुल केले.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे, अप्पर पोलीस आयुक्त डॉ. श्री संजय शिंदे, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्रीमती स्वप्ना गोरे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे डॉ. प्रशात अमृतकर, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सतिश नांदुरकर व गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप आयुक्त,
गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड